केंद्र शासन पुरस्कृत जलमणी कार्यक्रमाच्या
अंमलबजावणीसाठीची कार्यपद्धती निश्चित
करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन परिपत्रक क्र. ग्रापाधो-१११०/ प्र.क्र.१९६/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १ ऑक्टोबर, २०१०.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, पापुवस्ववि, क्र. डब्ल्युक्युएम २००८/प्र.क्र.०६८/पापु-१२, दि.०३ नोव्हेंबर,२००८.

२) शासन निर्णय, पापुवस्ववि, क्र. ग्रापाधो १११०/प्र.क्र.०५०/पापु-०७, दि.०३ मार्च,२०१०.

**प्रस्तावना :-**

ग्रामीण शाळांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे यासाठी केंद्र शासनाने सन २००८ मध्ये जलमणी कार्यक्रम घोषित केला. त्यानुसार, ग्रामीण शाळांमध्ये या कार्यक्रमांतर्गत जलशुद्धीकरण सयंत्रे बसविण्याची प्रक्रिया राज्यात सुरु आहे.

२. सद्यस्थितीत, जलमणी कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यस्तरावरून पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून तर कार्यक्रमाचे सनियंत्रण विभागीय भारत निर्माण कक्ष, नागपूर यांचेकडून करण्यात येते. मात्र, जलमणी कार्यक्रमांतर्गत ग्रामीण शाळांमध्ये जलशुद्धीकरण संयंत्रे बसविण्यासाठी प्रशासकीय स्तरावर शालेय शिक्षण विभाग व जिल्हास्तरावर जिल्हा परिषदा तसेच शिक्षणाधिकारी यांचेमध्ये या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात योग्य तो समन्वय राहत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

३. जलमणी कार्यक्रमाचा आढावा मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय समितीमार्फत दि.१६ जुलै,२०१० रोजी घेण्यात आला. यामध्ये, जलमणी कार्यक्रमाची अंमलबजावणी, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या सहकार्याने करण्यात यावी आणि कार्यक्रमाच्या प्रभावी संनियंत्रणासाठी जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात यावी असे निर्णय घेण्यात आले.

४. त्याअनुषंगाने, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४ ऑगष्ट, २०१० रोजी प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये जलमणी कार्यक्रमाची अंमलबजावणी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या संयुक्त सहकार्याने करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा होऊन या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरीता अधिक परिणामकारक कार्यपद्धती विहित

करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने सुचना देण्यासाठी शासन परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

आर्थिक वर्ष सन २०१०-११ पासून केंद्र पुरस्कृत जलमणी कार्यक्रमाची अंमलबजावणी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या संयुक्त सहभागाद्वारे करण्यात यावी. या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीचे अनुषंगाने विविध जबाबदा-या पार पाडण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपद्धती विहित करण्यात येत आहे.

२. राज्यस्तरावरील शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून प्रत्येक जिल्हयातील ग्रामीण शाळांमधील पिण्याच्या पाणी पूरवठा व्यवस्थेची तसेच या शाळांमध्ये उपलब्ध पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता विषयक माहिती संकलीत करून, त्यानुसार जलमणी संयंत्रे बसविण्याकरिता जिल्हानिहाय शाळांची यादी तयार करण्याची कार्यवाही करण्यात यावी व ही यादी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून प्राप्त माहितीच्या आधारे, शाळांमध्ये बसवावयाच्या जलशुद्धीकरण संयंत्राची निवड (सयंत्रांची वर्गवारी व पाणी गुणवत्ता निहाय) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून करण्यात यावी.

४. जलमणी कार्यक्रमांतर्गत जलशुद्धीकरण सयंत्रे खरेदी करण्यासाठी संदर्भ क्र. ०२ येथील शासन निर्णयान्वये विभागीय खरेदी समितीची स्थापना केलेली आहे. आता या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा सहभाग राहणार असल्यामुळे, सदर शासन निर्णय अधिक्रमित करून पुढीलप्रमाणे समिती नव्याने गठीत करण्यात येत आहे :

| | |
|---|---|
| १.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| २.प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य |
| ३.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ४.उप सचिव,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| ५.प्रकल्प संचालक, सर्व शिक्षा अभियान | सदस्य |
| ६.उद्योग सहसंचालक | सदस्य |
| ७.मुख्य अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष | सदस्य |
| ८.उप सचिव (पापु-०७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य सचिव |

५. आर्थिक वर्ष २०१०-११ पासून पुढे दरवर्षी जलमणी कार्यक्रमांतर्गत बसवावयाच्या जलशुद्धिकरण संयंत्रांचे दरकरार उद्योग ,उर्जा व कामगार विभागाकडून निश्चित करण्यात यावेत.

६. जलमणी कार्यक्रमाच्या जिल्हास्तरावरील अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषद स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी :

| | |
|---|---|
| १) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २) शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद | सदस्य |
| ३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद | सदस्य |
| ४) उप शिक्षणाधिकारी (सर्व शिक्षा अभियान) | सदस्य |
| ५) कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पू विभाग, जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

७. जिल्हा स्तरीय समितीची जबाबदा-या खालील खालीलप्रमाणे राहतील-

१) निवडल्या गेलेल्या पुरवठादार कंपन्यांना जिल्हानिहाय शाळांची यादी पुरविणे. २) या पुरवठादारांकडून संबंधित शाळांमध्ये संयंत्रे बसवून घेणे, त्यांचे संनियंत्रण करणे.

३)पुरवठादारांकडून जलशुद्धीकरण संयंत्राची उभारणी करून घेणे, जलशुद्धीकरण संयंत्राची दैनंदीन देखभाल व संयंत्राद्वारे पाणी पुरवठा सुरळीत सुरु राहील याबाबतची खात्री संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व ग्राम शिक्षण समितीच्या माध्यमातून करणे.

४)ग्राम शिक्षण समिती व संबंधित शाळांचे मुख्याध्यापक यांच्यामार्फत कार्यक्रमाच्या भौतीक प्रगतीची माहिती घेऊन ती जिल्हास्तरावरील समितीस तसेच शासनास सादर करणे

८. संबंधित कंपन्यांकडून बसविलेल्या जलशुद्धीकरण संयंत्राची चाचणी घेऊन ती कार्यान्वित करण्याबाबतची व तसे प्रमाणित करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांची राहील.

९. शाळांमध्ये बसविण्यात आलेल्या जलशुद्धीकरण संयंत्रातून उपलब्ध होणा-या पाण्याची गुणवत्ता चाचणी Field Test Kits (FTKs) मार्फत करण्यात य़ावी. FTKs ची खरेदी शालेय शिक्षण व क्रिडा विभागामार्फत करण्यात यावी.

**१०. जलशुद्धीकरण सयंत्रांची देखभाल दुरुस्ती :**

जलशुद्धिकरण संयंत्रांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी शाळेचे मुख्याध्यापक / ग्राम शिक्षण समिती यांची राहिल.य़ामध्ये खालील बाबींचा समावेश राहिल-

१) संयंत्र दररोज चालवून शुध्द पाणी संयंत्रासोबत असलेल्या पाण्याच्याटाकीमध्येसाठवणे व योग्य रित्या विद्यार्थ्यांना वितरीत होईल याची काळजी घेणे.

२) संयंत्रामध्ये बिघाड झाल्यास संयंत्र बसविणा-या कंपनीच्या प्रतिनिधीस बोलावून त्यांचेकडून दुरूस्त करून घेणे.

३) कंपनीमार्फत संयंत्राची देखभाल दुरूस्ती वर्षभर कशाप्रकारे झाली याचा अहवाल वर्ष अखेर सादर करणे.

४) देखभाल दुरूस्तीचे देयक देण्याबाबत अभिप्राय देणे.

११. जलमणी कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी, संयंत्रांच्या किमतीनुसार संबंधित जिल्ह्यांच्या सर्व शिक्षा अभियानच्या खात्यामध्ये जमा करण्यात यावा.

१२. जिल्हा शिक्षणाधिका-यांनी ग्रामीण शाळांमध्ये जलशुद्धीकरण सयंत्रे बसविण्यात आल्याची व ती व्यवस्थित चालू असल्याची खात्री करुन, तशा आशयाची प्रमाणपत्रे संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांकडून प्राप्त करून संबंधित पुरवठादारांना देयके अदा करावीत. निधीची उपलब्धता व वितरण याबाबतची तपशीलवार माहिती शिक्षणाधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावी.

१३. जलमणी कार्यक्रमांतर्गत जलशुद्धीकरण संयंत्रे बसविण्याकरीता निवडण्यात आलेल्या शाळा, बसविण्यात आलेली संयंत्रे व निधी वितरण याची माहिती ऑनलाईन भरण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांची राहील.

१४. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेब साईट www.maharashtra.gov.in वर टाकण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक **क्र. २०१०१००४१३५५२६००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
(डॉ. निपुण विनायक )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
जिल्हाधिकारी, (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा(सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
तहसीलदार (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.